आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
गुरुवार, दिनांक १२ सप्टेंबर २०२४

ठळक बातम्या

1. आयुष्मान भारत पीएम जन आरोग्य योजनेचा लाभ 70 वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना देण्याचा केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय.
   पंतप्रधान ग्राम सडक योजनेच्या चौथ्या टप्प्यात ६२ हजार ५०० किलोमीटर लांबीच्या रस्ता बांधणीस मान्यता; 70 हजार 125 कोटी रुपयांची तरतूद.
2. १३० किमी प्रति तास गतीने धावणारी १६ डब्यांची अत्याधुनिक 'नागपूर ते सिकंदराबाद' वंदे भारत एक्स्प्रेस १५ सप्टेंबरपासून प्रवाशांच्या सेवेत.
3. NSSCDCL नागपूर शहरात स्मार्ट पार्किंग प्लाझा, इ शौचालय आणि पारडीचा क्षेत्रनिहाय विकास 2025 पर्यंत पूर्ण करणार.
4. डाव्या चळवळीचे अग्रणी नेते मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे महासचिव सीताराम येचुरी यांचं दिल्लीत उपचारा दरम्यान निधन.

****

## केंद्रीय मंत्रिमंडळ निर्णय

आयुष्मान भारत, पीएम जनआरोग्य योजनेंतर्गत उत्पन्नाची अट न ठेवता सत्तर वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या सर्व ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य संरक्षण देण्यास केंद्रीय मंत्रिमंडळानं काल मान्यता दिली. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी बैठकीनंतर सांगितलं की, ज्येष्ठ नागरिकांना पाच लाख रुपयांपर्यंत मोफत उपचाराची सुविधा मिळणार आहे. देशातील सहा कोटी ज्येष्ठ नागरिकांना याचा लाभ होईल. केंद्रीय मंत्रिमंडळानं, “पंतप्रधान ई-बस सेवा पेमेंट सुरक्षा यंत्रणा योजने”ला, देखील मंजुरी दिली असून, सार्वजनिक वाहतूक प्राधिकरणांना ई-बस खरेदी आणि कार्यान्वयन शक्य व्हावे यासाठी त्यात तीन हजार 435 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय अवजड उद्योग मंत्रालयाचा प्रस्ताव स्वीकारून पंतप्रधान ई-ड्राईव्ह योजने'ला ही मंजुरी दिली आहे. यामुळ देशात विजेवर चालणाऱ्या वाहनांचा वाहतुकीसाठी वापर वाढण्याला प्रोत्साहन मिळणार आहे. योजनेत दोन वर्षांसाठी दहा हजार 900 कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आली आहे. आर्थिक वर्ष 2024-25 ते 2028-29 या काळासाठी, पंतप्रधान ग्राम सडक योजना–चारच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत पात्र 25,000 वस्त्यांना प्रथमच जोडणारे 62 हजार 500 किलोमीटर लांबीचे रस्ते बांधण्यासाठी आर्थिक सहाय्य पुरवले जाणार असून, त्यात नव्या रस्त्यांच्या बांधकामासह पुलांचे बांधकाम/दुरुस्ती केली जाणार आहे. या योजनेचा एकंदर खर्च 70 हजार 125 कोटी रुपये आहे.

## वंदे भारत एक्स्प्रेस

मध्य आणि दक्षिण भारतातील प्रमुख संपर्कासाठी वंदे भारत एक्स्प्रेस सेवा १५ सप्टेंबरपासून प्रवाशांच्या सेवेत येत आहे. १३० किमी प्रति तास गतीनं धावणारी ही १६ डब्यांची अत्याधुनिक रेल्वेगाडी नागपूर ते सिकंदराबाद दरम्यान धावेल. नागपूर ते सिकंदराबाद, वंदेभारत एक्स्प्रेस पाच प्रमुख स्थानकांवर थांबेल, ज्यात चंद्रपूर जिल्हा समाविष्ट असून, चंद्रपूर आणि बल्लारपूर स्थानकावरून प्रवाशांना विशेष सुविधा मिळतील. यापूर्वी जानेवारी २०२३ मध्ये या गाडीची चाचणी घेण्यात आली होती. आता दररोज धावणाऱ्या या एक्स्प्रेसच्या वेळापत्रकानुसार, हि रेल्वेगाडी नागपूर इथून सकाळी पाच वाजता सुटेल तर सिकंदराबादला दुपारी सव्वाबारा वाजता पोहचेल.सिकंदराबादहून परतीचा प्रवास रात्री एक वाजता सुरू होईल आणि ती गाडी सकाळी आठ वीस वाजता, नागपूरला पोहोचेल. ही बातमी हिंदुस्तान समाचार वृत्त संस्थेनं दिली आहे.

## राज्यातली प्रमुख धरणं

राज्यातली प्रमुख धरणं सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यातच ९० ते ९५ टक्के भरली आहेत. मराठवाड्यात जायकवाडी धरण ९८ टक्के, सोलापुरात उजनी धरण १०० टक्के आणि साताऱ्यातलं कोयना धरण ९९ टक्के भरलं आहे. पुणे आणि कोकणातली ९७ टक्के धरणं पूर्ण भरली असून, मुंबई तसंच ठाणे जिल्ह्यातली धरणंही ९५ ते १०० टक्के, नागपूर विभागातली धरणं ८५ टक्के भरली आहेत. अमरावतीतील ऊर्ध्व वर्धा धरण ९५ टक्के तर यवतमाळमधील इसापूर धरण ९८ टक्के भरलं आहे. गोसीखुर्द धरण केवळ ५५ टक्के तर उत्तर महाराष्ट्रातलं जळगावमधलं उर्ध्व तापी धरण ४५ टक्के भरलं आहे. ऑक्टोबरपर्यंत उर्वरित धरणंही भरतील असा अंदाज असून, यामुळ शेतकऱ्यांना रब्बी हंगामात जास्त उत्पादनाची अपेक्षा आहे.

## गौरी गणेश उत्सव विशेष

तीन दिवसीय महालक्ष्मी उत्सवाचा आज समारोप होत असून, काल पूजन झालेल्या ज्येष्ठा कनिष्ठा गौरींचं आज सायंकाळी विसर्जन होत आहे. यानिमित्तानं घरोघरी महिला वर्गाकडून विविध पारंपरिक सोहळ्यांचं आयोजन करण्यात येत आहे. दरम्यान, गणेशोत्सवात सार्वजनिक गणेश मंडळांचे देखावे पाहण्यासाठी नागरिक मोठ्या संख्येनं गर्दी करत आहेत. वाशीम जिल्ह्यातील मंगरूळपीरचे कलाकार, सागर गुल्हाणे यांनी तयार केलेला, बी.एस.एन.एल. आणि भारतीय डाक कार्यालय यांचा माहितीपर देखावा वाशीमकरांचे लक्ष वेधून घेत आहे. याशिवाय इंडियन ऑईल कंपनीची देखील प्रतिकृती उभारून पुन्हा या कंपन्यांना भरभराटीचे दिवस यावेत या सदिच्छा देखाव्यातून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. दरम्यान, गणेश उत्सवाच्या कालच्या पाचव्या दिवशी नागपुरात दोन हजार 942 श्रीगणेश मूर्तींचं विसर्जन विविध ठिकाणी करण्यात आलं. यामध्ये पी.ओ.पी.च्या 69 मूर्ती आढळून आल्यात.

## राज्यभर आंदोलन

काँग्रेस खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या विरोधात, भाजपकडून उद्या राज्यभर आंदोलन करण्यात येणार आहे. खासदार राहुल गांधी यांनी आरक्षण विरोधी वक्तव्य केल्याच्या निषेधार्थ, हे आंदोलन करण्याचा निर्णय भाजपनं घेतल्याचं कळवण्यात आलं आहे. काँग्रेस हटाओ, आरक्षण बचाओ असा नारा देत, हे आंदोलन करण्यात येणार आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे अकोल्यात तर, चंद्रपुरमध्ये मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन होणार आहे.

## मिलिंद माने

दरम्यान, काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केलेल्या संविधान संपवणार या वक्तव्या विरोधात भाजपाच्या अनुसूचित जाती मोर्चानं आज नागपूरच्या संविधान चौकात आंदोलन केलं. यावेळी राहुल गांधी यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याचं दहन करण्यात आलं.

## स्मार्ट सिटी

नागपूर स्मार्ट अँड सस्टनेबल सिटी डेवलपमेंट कॉप्रोरेशन लिमिटेड अर्थात एन.एस.एस.सी.डी.सी.एल.तर्फे, नागपूर शहरामध्ये स्मार्ट पार्किंग प्लाझा, इ-टॉयलेट्स त्याचप्रमाणे पारडी या भागाचा क्षेत्रनिहाय विकास होत असून, स्मार्ट सिटी अंतर्गत सर्व कामं, ही मार्च 2025 पर्यंत, पूर्ण करण्याचा आपला मानस असल्याचं एन.एस.एस.सी.डी.सी.एल.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितलं. स्मार्ट सिटीच्या कामात दिरंगाई करणाऱ्या कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करू असं देखील त्यांनी स्पष्ट केलं. सीताबर्डी इथल्या स्मार्ट पार्किंग प्लाझाचं उद्घाटन लवकरच होत असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. एन.एस.एस.सी.डी.सी.एल. ही एक विशेष उद्देशानं तयार केलेली यंत्रणा आहे. या मार्फत विकास कामं तसंच तंत्रज्ञान विषयक बाबी विकसित करून ती संबंधित यंत्रणेला सोपवली जातात. शहरात ट्रॅफिक पोलिसांसाठी असणारे स्मार्ट बूथ हे त्यांना पावसापासून संरक्षण मिळण्यासाठी, स्मार्ट सिटी

मिशन अंतर्गत बसवण्यात आलं आहे. त्याचप्रमाणे सी.सी.टीव्ही, ई-शौचालये सुद्धा, मनपाला सुपूर्द करण्यात आली आहेत असं, शर्मा यांनी सांगितलं.

## सीताराम येचुरी

मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी, सी.पी.आय.(एम)चे सरचिटणीस सीताराम येचुरी यांचं आज निधन झालं. ते 72 वर्षांचे होते. येचुरी यांना दिल्लीतील एम्समध्ये 19 ऑगस्ट रोजी दाखल करण्यात आलं होतं. सी.पी.आय.(एम)द्वारे दिलेल्या निवेदनानुसार येचुरी यांना श्वसनमार्गाच्या तीव्र संसर्गानं ग्रासलं होतं. येचुरी यांचा जन्म बारा ऑगस्ट १९५२ रोजी चेन्नई इथं तेलुगू भाषिक कुटुंबात झाला. त्यांनी दिल्लीच्या सेंट स्टीफन्स कॉलेजमधून अर्थशास्त्रात बी.ए. (ऑनर्स)चं आणि जवाहरलाल नेहरू विद्यापीठातून, अर्थशास्त्रात एम.ए.केलं होतं. ते कायमच विविध चळवळीत सक्रिय होते. आणीबाणीच्या काळात जे.एन.यू.मध्ये विद्यार्थी असताना त्यांना अटक करण्यात आली होती. त्यांच्या निधनाबद्दल राजकीय वर्तुळातून दुःख व्यक्त होत आहे. 'सीताराम येचुरी हे आपले चांगले मित्र होते. देशाच्या जडण घडणीचे सखोल आकलन असलेला नेता आपण गमावला आहे.' अशी भावना काँग्रेस नेते, राहुल गांधी यांनी समाज माध्यमावरील संदेशात व्यक्त केली. 'ज्येष्ठ माकप नेते सीताराम येचुरी यांच्या निधनाचे वृत्त दुःखद असून, शेतकरी, कष्टकरी आणि सामान्य माणूस यांच्या हितासाठी आपले आयुष्य झोकून देणारा एक विचारवंत, तत्वनिष्ठ नेता देशानं गमावला या शब्दात, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दुःख व्यक्त केलं आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार

महाराष्ट्र शासनाच्या उच्च आणि तंत्र शिक्षण विभागांतर्गत, ग्रंथालय संचालनालयाकडून, राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचा गुणात्मक विकास व्हावा, ग्रंथालयांकडून जनतेला अधिक चांगल्या सेवा उपलब्ध करुन द्याव्यात, वाचन संस्कृती वृध्दींगत करण्यासाठी प्रोत्साहन मिळावं या उद्देशानं "डॉ.बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार" तसंच ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते आणि सेवक यांना भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक, डॉ.शियाली रामामृत रंगनाथन यांच्या नावानं पुरस्कार देण्यात येतो. सन 2023-24 या वर्षीच्या पुरस्कारासाठी इच्छुक असणारी ग्रंथालये, कार्यकर्ते आणि सेवक यांनी आपले विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह, 25 सप्टेंबरपर्यंत तीन प्रतीत आपल्या जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांकडे पाठवावेत असं आवाहन, करण्यात आलं आहे.

## पर्युषण पर्व

जैन धर्मातील सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे क्षमायाचना. क्षमा हे वीरांचे भूषण असून, ज्यामध्ये अहंकार नसतो. क्षमावाणी पर्व मन, शब्द आणि शरीरातून क्षमा करण्याचा संदेश देत असून, जैन धर्मियांचे पर्युषण पर्व म्हणजे क्षमा आणि प्रेमाचा उत्सव असल्याचं प्रतिपादन राज्याचे वनं, सांस्कृतिक कार्यमंत्री आणि चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केलं.जैन समाजातर्फे आयोजित जैन भवन इथं क्षमापना कार्यक्रमा प्रसंगी ते बोलत होते. यावेळी जैन समाजाचे गुरु, संस्था संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## पद्म पुरस्कार-2025

प्रजासत्ताक दिनी जाहीर होणाऱ्या, पद्म पुरस्कार-2025 साठी नामांकन किंवा शिफारसी या महिन्याच्या 15 तारखेपर्यंत स्वीकारल्या जातील. एक मे रोजी ही प्रक्रिया सुरू झाली असून, संबंधित नामांकन केवळ, राष्ट्रीय पुरस्कार पोर्टल awards.gov.in वर ऑनलाइन स्वीकारल्या जातील. शिफारशींमध्ये विशिष्ट आणि अपवादात्मक कामगिरी किंवा सेवेचा तपशील यांचा समावेश असावा. जास्तीत जास्त 800 शब्दांच्या माध्यमातून कार्याचे कथन केले असावं असं पत्रकात म्हटलं आहे.

## हवामान

आजपासून १५ सप्टेंबरपर्यंत विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये हवामान सामान्य राहणार असून, कुठलीही धोक्याची सूचना हवामान खात्यानं जारी केली नाही. १६ सप्टेंबर रोजी विदर्भात बहुतांश जिल्ह्यात वादळी पर्जन्यमान राहण्याचा अंदाज विभागानं वर्तवला आहे. दरम्यान, आज दुपारच्या सुमारास नागपुरात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसानं हजेरी लावली. मागील दोन दिवसांपासून झालेल्या संततधार पावसानं, भंडारा जिल्ह्यातील वैनगंगा नदीनं धोक्याची पातळी ओलांडली आहे. त्यामुळे वैनगंगा नदीच्या पाणलोट क्षेत्रातील पाणी शहरात शिरलं असून सहकार नगर आणि विद्या नगर या भागात अनेक कुटुंब अडकली होती. बचाव पथकाच्या मदतीनं सर्वांना बाहेर काढण्यात आलं.

******